# मराठी (प्रश्न-पत्र–I)

( साहित्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 250 |
|---|---|

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

# MARATHI (PAPER—I)

( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *150* शब्दांत लिहा : 10×5=50

(a) 'भाषेचे समाजशास्त्र', स्पष्ट करा.

(b) वऱ्हाडी बोलीची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती?

(c) द्वितीया आणि चतुर्थी या विभक्तींचे प्रत्यय सारखेच असल्यामुळे त्या दोन्हींपैकी एकच मानावी काय, आणि ती कोणती याची चिकित्सा करा.

(d) मराठीतील लोककथांचे स्वरूप सांगा.

(e) 'लोकगीत' संकल्पना स्पष्ट करून त्याचे स्वरूप-विशेष लिहा.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'चॉम्स्कीच्या सिद्धांताने भाषेचे स्वरूप स्पष्ट होण्यास कशी मदत होते' याची चर्चा करा. 20

(b) सतराव्या शतकातील मराठी भाषेवर फार्सीचा प्रभाव कसा आहे ते सोदाहरण सांगा. 15

(c) तमाशा या लोकसाहित्य प्रकाराच्या सादरीकरणाची वैशिष्ट्ये सांगा. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) भाषा आणि बोली यातील फरक सांगून प्रमाणभाषेचे महत्त्व विशद करा. 20

(b) 'व्यवसाय आणि स्तर यातील भेदानुसार भाषिक परिवर्तन होते' सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) भाषेची मूलभूत कार्ये कोणती ते सांगा. 15

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) एकोणविसाव्या शतकातील भाषेचे स्वरूप विशेष स्पष्ट करा. 20

(b) प्रयोगाचे प्रकार सांगून कर्मणी प्रयोग सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) विभक्तीचे प्रकार सांगून पंचमी विभक्तीच्या प्रत्ययांत कालांतराने कोणती भर पडली? का? 15

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *150* शब्दांत लिहा : 10×5=50

*(a)* 'मानवतेच्या आग्रही भूमिकेमुळे संत तुकाराम महाकवी ठरले' या विधानाची सार्थकता स्पष्ट करा.

*(b)* 'लीळाचरित्र' आद्य गद्य ग्रंथ आणि आद्य गद्य चरित्र ग्रंथ म्हणून महत्वाचा ग्रंथ आहे' याची सार्थकता नोंदवा.

*(c)* 'लावणी आणि पोवाडा' यांचे स्वरूप-विशेष लिहा.

*(d)* साहित्यकृतीचे स्वरूप-विशेष उलगडून सांगा.

*(e)* 'स्त्रीवादी साहित्य' ही संकल्पना स्पष्ट करा.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे द्या :

*(a)* 'आधुनिक मराठी कवितेला नारायण सुर्वे यांच्या नंतर वेगळे वळण मिळाले' या विधानाचा परामर्श घ्या. 20

*(b)* समीक्षेच्या विविध पद्धतींची माहिती द्या. 15

*(c)* 'वास्तववाद आणि मराठी कादंबरी' यांच्या अनुबंधाची सोदाहरण चर्चा करा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे द्या :

*(a)* मराठी कथा साहित्यातील जी. ए. कुलकर्णी यांचे स्थान स्पष्ट करा. 20

*(b)* मराठी नाटकातील स्थित्यंतरांचे विविध टप्पे सांगा. 15

*(c)* साठोत्तरी साहित्य प्रवाहाचे स्वरूप, विशेष आणि वेगळेपण स्पष्ट करा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे द्या :

*(a)* 'बखर वाङ्मयात ऐतिहासिक सत्याचा अभाव असतो' या विधानाची चर्चा करा. 20

*(b)* सौंदर्यवादी साहित्याचे गुणविशेष सांगा. 15

*(c)* साहित्य आणि इतर कला यांचा अनुबंध सांगून साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करा. 15

★ ★ ★